# दैवी आरोग्य

## याकोब.५:१४-१८

**१. तुमची पापे एकमेकांजवळ कबूल करून अडखळणे दूर करा (याकोब.५:१४-१८).** तुमच्या गटातील प्रत्येक व्यक्तीने (प्रार्थना करणारा सेवक आणि ज्याच्यासाठी प्रार्थना केली जात आहे ती व्यक्ती) आपल्या अंतःकरणाच्या डोळ्यांनी येशूवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तुमचे लक्ष येशूवर केंद्रित करा आणि त्याचे आरोग्यदायी सामर्थ्य तुमच्याकडे प्रवाहित होण्यामध्ये काही अडखळण आहे का ते त्याला विचारा. त्या क्षणी तुमच्या मनात जे विचार किंवा चित्र येईल त्याच्याशी तुमचे मन ट्यून अप करण्याद्वारे त्याला प्रतिसाद द्या. (देवाची वाणी कशी ऐकावी हे शिकण्यासाठी www.cwgministries.org या वेबसाईटवरील ‘‘तुम्ही देवाची वाणी ऐकू शकता’’ हा लेख तुम्ही वाचू शकता.) तुम्ही निरोगी जीवनशैलीचा अंगिकार करा. यात चौरस आहार, नियमित व्यायाम, उपास/स्वच्छता आणि तणावमुक्त जीवन यांचा समावेश होतो. तुमची पापे कबूल करा. देवासमोर तुम्ही निष्पाप असावे म्हणून क्षणोक्षणी तुमची पापे कबूल करण्यास शिका. तुमच्या गटामधील या नम्रतेच्या आणि पवित्रतेच्या दृष्टीकोनामुळे देवाचे सामर्थ्य मोकळे होते.

**२. देवाच्या सान्निध्यात प्रवेश करणे हा आरोग्याचा पाया आहे :** डॉ. विर्कलर यांच्या एका सहकाऱ्याला देवाने म्हटले, ‘‘माझ्या समक्षतेत येण्याचा सराव तू अगोदर केला पाहिजेस. म्हणजे मग आपण बोलू. माझ्या शब्दांपेक्षा माझी समक्षता जास्त महत्त्वाची आहे. माझ्या समक्षतेत असल्यावर आरोग्य मिळते.’’ तुमच्या आत्म्यात ख्रिस्ताची भक्ती करण्याद्वारे ख्रिस्तकेंद्रित व्हा. देवाच्या प्रकाशात ख्रिस्ताचे रूपांतर झाल्याचे पाहा (मत्तय.१७:१-८). त्याच्या आरोग्यदायी सामर्थ्यासाठी विनंती करा, ते मोकळे होत असल्याचे पाहा, ते प्रकाशासारखे दिसू शकते, शरीरात त्याची उष्णता जाणवू शकते, किंवा निराळी संवेदना जाणवू शकते. त्याचे आरोग्यदायी सामर्थ्य त्याच्या समक्षतेत मोकळे होते.

**३. आजाराचे मूळ कारण काय आहे ते शोधून काढा :** आजारी व्यक्तीला ‘‘हे पवित्र आत्म्या, माझ्या शरीरातील या आजाराचे कारण काय आहे ते तू मला दाखव’’ अशी प्रार्थना करायला सांगा. त्याच्या आजाराचे निश्चित कारण काय आहे ते त्याचे शरीर, त्याची स्मरणशक्ती आणि त्याच्यामध्ये असलेला पवित्र आत्मा यांना माहीत असते.) मग त्याला शांत, निःस्तब्ध होऊन देवाचा दृष्टान्त आणि वाणी (त्या क्षणी उत्स्फूर्तपणे त्याच्या मनात येणारे विचार आणि चित्रे) यांच्याशी आपले मन जुळवून घेण्यास (ट्यून अप करण्यास) सांगा आणि त्याला काय समजले किंवा प्रगट झाले हे तुम्हांला सांगण्यास सांगा. योग्य ती प्रार्थना करा.

**४. आरोग्यविषयक प्रार्थनेचे तीन भाग लक्षात घ्या : (वेदना नाहीशा करणे, दुष्ट आत्मे काढणे, शरीरातील अवयव बरे करणे).** दुःख, वेदना नाहीशा व्हाव्यात म्हणून प्रार्थना करा. ज्या व्यक्तीसाठी प्रार्थना केली जात आहे तिला आपल्या वेदना कमी झाल्याचे जाणवले, तर त्याचा विश्वास बळकट होण्यास मदत होते, आणि त्याचे लक्ष विचलीत होण्यास प्रतिबंध होतो.

त्रास देणाऱ्या दुष्ट आत्म्याने त्या व्यक्तीमधून निघून जावे म्हणून त्याला **ठामपणे** आज्ञा करा. बहुतेक/सर्व परिस्थितीत दुष्ट आत्मे आजाराला कारणीभूत आहेत असे गृहीत धरा. येशूने लोकांना आरोग्य दिले तेव्हा बहुतेक प्रकरणांमध्ये दुष्ट आत्मेच कारणीभूत होते हे मार्क.१:३९ आणि मत्तय.४:२३ वरून हे आपल्याला समजते :

**मार्क.१:३९** *‘‘मग तो सबंध गालीलांत त्यांच्या सभास्थानांतून उपदेश करीत व भुते काढीत फिरला.’’*

**मत्तय.४:२३** *‘‘नंतर यहूदी लोकांच्या सभास्थानात सुवार्तेची घोषणा करीत व राज्याची सुवार्ता गाजवीत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करीत गालीलभर फिरला.’’*

शरीराचे जे अवयव बाधित किंवा निकामी झाले आहेत ते निरोगी व्हावेत, पूर्वस्थितीवर यावेत म्हणून त्यांच्याशी प्रेमाने आणि निश्चितपणे बोला.

**५. दैवी प्रकटीकरण मिळवा** : तुम्ही येशूकडे पाहत असताना आणि त्याचे आरोग्यदायी सामर्थ्य संबंधित व्यक्तीमध्ये प्रवाहित होत असलेले पाहताना, निश्चित कोणते आरोग्य मिळण्याची गरज आहे, आणि ते आरोग्य तो कशा प्रकारे देऊ इच्छित आहे याविषयी त्याला (येशूला) विचारा. तुमच्या मनात त्या क्षणी उत्स्फूर्तपणे येणाऱ्या विचारांशी, आणि तुमच्या मनचक्षूंसमोर येणाऱ्या चित्रांशी तुमचे मन ट्यून अप करून त्याच्या उत्तराला प्रतिसाद द्या, आणि तो तुम्हांला जे काही करायला सांगत आहे, तसे करून त्याची आज्ञा पाळा. पवित्र आत्मा तुम्हांला ज्या प्रकारची प्रार्थना - विनंती, आज्ञा, किंवा घोषणा - करण्यास सांगत आहे तशी प्रार्थना करा.

**६. मोठ्या प्रगटीकरणासाठी एकत्र या** : अडखळणे दूर करण्यासाठी देव जे काही सांगत आहे ते समजून घेण्यास आणि ते इतरांना सांगून त्यानुसार कृती करण्यास तयार असलेले दोन किंवा किंवा तीन प्रार्थना सेवक एकत्र आले, तर दैवी प्रगटीकरणाचा आवाका मोठा होतो आणि रोगाचे जू लवकर मोडून व्यक्तीला आरोग्य मिळते.

**७. दुष्ट आत्म्यांना घालवून देणाऱ्या सामर्थ्यशाली प्रार्थना** : ज्या व्यक्तीसाठी प्रार्थना केली जात आहे आणि प्रार्थना करणाऱ्या व्यक्ती किंवा मार्गदर्शक प्रार्थनेद्वारे मिळणाऱ्या मार्गदर्शनाशी पुढील प्रकारे सुसंवादित राहू शकतात : १. देव जी व्यक्ती लक्षात आणून देईल तिला क्षमा करणे; २. देव ज्या पापाची आठवण देईल ते कबूल करणेच ३. पिढ्यान्‌पिढ्यांपासून चालत आलेली पापे आणि शाप तोडणे; ४. दुष्ट आत्म्यांबरोबर असलेले संबंध तोडून टाकणेच ५. नकारात्मक विश्वास काढून टाकणे; ६. आंतरिक प्रतिज्ञा, नवस काढून टाकणे, ७. शाब्दिक शाप तोडून टाकणे; ८. स्मृती किंवा आठवणींमध्ये येशूचे दृष्टान्त पाहून आंतरिक आरोग्य मिळवणे; ९. दुष्ट आत्म्यांना घालवून देणे. या सर्व मुद्‌द्यांविषयी सविस्तर माहिती तुम्हांला www.cwgministries.org/freebooks या वेबसाईटवर ''कॉन्ट्रिब्युटींग स्ट्रॅन्ड्स वर्कशीट'' या लेखात पाहायला मिळेल, तसेच डॉ. मार्क विर्कलर आणि डॉ. पॅट्टी विर्कलर यांच्या *अंतःकरणाला आरोग्य देणाऱ्या प्रार्थना Prayers that Heal the Heart* (Bridge-Logos, 2001) या पुस्तकात तुम्हांला अधिक माहिती मिळेल.

**८. तेलाने अभिषेक करा** : ज्या तेलावर प्रार्थना केली आहे ते तेल दैवी आरोग्याचे सामर्थ्य प्रवाहित व्हावे म्हणून वापरा (याकोब.५:१४-१५).

**९. आरोग्यदायी सामर्थ्याचा प्रवाह पाहून त्याची तीव्रता वाढवा** : येशूचे दैवी आरोग्यदायी सामर्थ्य प्रवाहित व्हावे म्हणून म्हणून त्याला विनंती करा आणि प्रकाशित सामर्थ्य त्या व्यक्तीमध्ये आणि त्या व्यक्तीवर प्रवाहित होत असल्याचे पाहा; त्याच्या दुर्बलतेवर, आजारावर ते केंद्रित झाल्याचे पाहा, देवाचा अभिषेक त्या व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करीत असल्याबद्दल देवाची उपकारस्तुती करा.

**१०. दैवी किरणविसर्जन पद्धतीचा** (radiation treatment) **उपचार करा** : आजारी व्यक्तीवर देवाचे सामर्थ्य/प्रकाश प्रवाहित व्हावा म्हणून दोन ते पाच माणसांना १०-१५ मिनिटांसाठी त्या व्यक्तीवर आपले हात (इलेक्ट्रिक सर्किट पूर्ण व्हावे म्हणून दोन्ही हात ठेवावेत) ठेवण्यास सांगा.

**११. त्यांच्याकडून नियमितपणे प्रतिसाद घ्या** : आता कसे वाटते (बरे, आहे तसेच, पूर्वीपेक्षा वाईट) हे त्या व्यक्तीला विचारा आणि त्यानुसार प्रतिसाद द्या.

**१२. आरोग्य मिळाल्याची खात्री करून घ्या** : आरोग्य मिळालेल्या व्यक्तीचे एक सुस्पष्ट विश्वास-चित्र आपल्या मनात तयार करा आणि ''प्रभू मी तुझा आभारी आहे, तुझे सामर्थ्य या व्यक्तीला बरे करीत असल्यामुळे ही व्यक्ती अगदी अशीच (मनातील विश्वास-चित्राप्रमाणे होणार आहे म्हणून मी तुझे उपकार मानतो,'' असे म्हणा.

# दैवी आरोग्यदानाची साक्ष

पुढील फॉर्म भरा.

अहवाल देणाऱ्याचे नाव : ______________________ ई-मेल पत्ता : ______________

आजारी व्यक्तीचे नाव : ______________________ शहर ____________ राज्य : ______________

ई-मेल : ______________ फोन क्र. ______________

कोणत्या आजारासाठी प्रार्थना केली : ______________________ दिनांक : ______________

प्रार्थना करणारे लोक ______________ ______________ ______________

______________ ______________ ______________

किती वेळ प्रार्थना केली ______________ पूर्वी किती वेळा प्रार्थना केली ______________

**पहिली प्रार्थना**

_______ % वेदना कमी झाली. लागलेला वेळ _______

_______ किती % आरोग्य मिळाले. लागलेला वेळ _______

**दुसरी प्रार्थना**

अजून _______ % वेदना कमी झाली. लागलेला वेळ _______

किती _______ % आरोग्य मिळाले. लागलेला वेळ _______

**वापरलेली साधने :**

- पापे कबूल केली
- देवाच्या समक्षतेत प्रवेश केला
- मूळ कारणाविषयी प्रगटीकरण मिळवले
- वेदना नाहीशी व्हावी म्हणून आज्ञा केली
- दुष्ट आत्म्यांना निघून जाण्याची आज्ञा केली
- शरीराच्या ज्या अवयवाला आरोग्य हवे होते त्या अवयवाशी बोललो
- मोठे प्रगटीकरण व्हावे म्हणून टीम केली
- तेलाचा वापर केला
- देवाने दाखवून दिलेल्या व्यक्तीला क्षमा केली
- पिढ्यानूपिढ्या चालत आलेली पापे आणि शाप मोडून टाकले
- दुष्ट आत्म्यांबरोबरचे संबंध तोडून टाकले.
- नकारात्मक विश्वास काढून टाकला
- आंतिरक दुष्टता काढून टाकली
- शाब्दिक शाप तोडले
- आंतरिक आरोग्य
- सुटका
- संबंधित अवयवामध्ये प्रकाश शिरत असल्याचे पाहिले
- उष्णता जाणवली
- सामर्थ्य/संवेदना जाणवली.
- २-५ व्यक्तींनी १५ मिनिटे दैवी रेडिएशन ट्रीटमेन्ट (किरणविसर्जन उपचार) दिली.
- आजारी व्यक्तीकडून नियमितपणे प्रतिसाद घेतला.
- आरोग्य मिळत असल्याचे अंतःकरणाच्या डोळ्यांनी पाहिले.
- पूर्ण आरोग्य मिळाल्यामुळे देवाची उपकारस्तुती केली.

**काढून टाकलेल्या दुष्ट आत्म्यांची नावे :**

**लेखी सारांश :** प्रार्थनेच्या वेळी मिळालेले प्रगटीकरण आणि या प्रगटीकरणानुसार केलेल्या कृतीमुळे झालेले परिणाम याचा सारांश लिहा. आजारी व्यक्तीला जर प्रगटीकरण मिळाले असेल तर त्या प्रकटीकरणासमोर त्या व्यक्तीचे नाव लिहा.

तसेच केलेल्या आरोग्य सेवेचे विस्तृत वर्णन लिहा, आणि मिळालेल्या आरोग्याची खातरजमा वैद्यकीय क्षेत्रातील लोकांकडून केली असेल तर त्यांचे म्हणणेही लिहा. तुम्ही ज्या व्यक्तीसाठी प्रार्थना केली तिचे नाव, कधी प्रार्थना केली ती तारीख कृपया आम्हांला कळवा. धन्यवाद!